# परिशिष्ट 'पी'

## जागेवर प्रवेश फेरीची (Spot Admission) कार्यपध्दती

जागेवरील प्रवेश फेरीपूर्वी राबविण्यात आलेल्या प्रवेश फे-यांद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारांनी नोंदणी न केल्याने अथवा इतर कारणाने जागा रिक्त असल्यास अशा रिक्त जागांसाठी दि.१० ऑगस्ट,२०११ ते दि.१७ ऑगस्ट,२०११ या कालावधीत संबंधित महाविद्यालयस्तरावर खालील कार्यपध्दतीने जागेवर प्रवेश प्रक्रिया (**Spot Admission Round**) राबविण्यात येईल.

यापूर्वी राबविण्यात आलेल्या प्रत्येक प्रवेश फेरीतील अंतिम गुणवत्ताविषयक प्रवर्गनिहाय (Categorywise Last Merit) तपशील व अद्ययावत रिक्त जागांचा प्रवर्गनिहाय तपशील महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे ('मज्ञाम'-MKCL) यांच्याकडून **www.mcaer.org** व **http://oasis.mkcl.org/agriug** या संकेतस्थळावर दि. ०८ ऑगस्ट,२०११ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

**राज्यस्तरीय / विद्यापीठस्तरीय गुणवत्ता यादीत समाविष्ट असलेले आणि चालू शैक्षणिक वर्षाच्या पदवी प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित नसलेले (not admitted) उमेदवार जागेवर प्रवेश फेरीकरिता पात्र असतील.** अशा पात्र उमेदवारांनी तसेच संबंधित महाविद्यालयांनी खालील बाबी विचारात घ्याव्यात.

(१) संकेतस्थळावरील रिक्त जागांचा तपशील विचारात घेऊन उमेदवारांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचा आहे, त्या महाविद्यालयात **दि. १०/८/२०११ ते १७/८/२०११ या कालावधीत सकाळी १०.०० वाजता** आवश्यक ती सर्व मूळ कागदपत्रे व शुल्कासह उमेदवारांनी उपस्थित राहावे.

(२) संबंधित महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी स्वतः **सकाळी १०.०० ते ११.०० या वेळेत उपस्थित असलेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणवत्ता यादी तयार करून ती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावी.**

(३) वरीलप्रमाणे पात्र उमेदवारांचा गुणानुक्रमे विचार करून रिक्त जागांसाठी प्रवेश देण्यात यावेत. **आरक्षित प्रवर्गातील रिक्त जागांसाठी संबंधित प्रवर्गाच्या उमेदवारांनाच प्राधान्यक्रमाने प्रवेश देण्यात यावेत.** संबंधित आरक्षित प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, क्र.टीईएम ३३९७/१२९२६/(९०८६)/तांशि-१, दि. ११/७/१९९७ मधील कार्यपध्दतीनुसार अशा रिक्त जागांवर जागेवर प्रवेश फेरीच्या (Spot Admission Round) शेवटच्या दिवशी म्हणजेच **दि. १७ ऑगस्ट,२०११ रोजी** उपस्थित असलेल्या इतर उमेदवारांना गुणानुक्रमाने प्रवेश देण्यात यावेत. सदर शासन निर्णय **परिशिष्ट-'एन्'** येथे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. **मात्र कोणत्याही परिस्थितीत आरक्षित जागांवर प्रवेश मिळाला नाही, अशी तक्रार आरक्षित प्रवर्गाच्या उमेदवारांकडून कोणत्याही परिस्थितीत येणार नाही, याची दक्षता संबंधित सहयोगी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी घ्यावी.**

(४) उच्च गुणवत्ताधारक उमेदवार उशिरा हजर झाल्यास आणि त्यावेळी जागा रिक्त असल्यास, अशा **उच्च गुणवत्ताधारक उमेदवारास प्रथम प्राधान्याने प्रवेश देण्यात यावा.**

(५) योग्य त्या उमेदवाराची प्रवेशासाठी निवड निश्चित झाल्यास त्याप्रमाणे महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पुणे ('मज्ञाम'-MKCL) **यांच्या संकेतस्थळावर नोंदणी करून 'लॉग इन'द्वारे महाविद्यालयांनी संबंधित उमेदवारास प्रवेश द्यावा.** यासाठी संकेतस्थळावरील महाविद्यालयांच्या 'लॉग इन'मध्ये योग्य ती सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी 'मज्ञाम' यांची असेल.

(६) दि. १०/८/२०११ ते १७/८/२०११ या कालावधीत दररोज सायंकाळी ४.३० पर्यंत वरील प्रवेश प्रक्रिया संबंधित महाविद्यालयस्तरावर करण्यात यावी.

**(७)** महाविद्यालयांनी दरदिवशी प्रवेश देण्यात आलेल्या प्रवेशांबाबतचा तपशील **संचालक (शिक्षण) व 'मज्ञाम' यांच्याकडे सायंकाळी ५.०० वाजेपूर्वी ई-मेलद्वारे कळवावा.**

(८) जागेवर प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या उमेदवारास त्याच्या **'**लॉग इन**'**मध्ये प्रशासकीय कारणास्तव 'मज्ञाम'ने तात्पुरते **'**प्रवेश वाटप पत्र**'** उपलब्ध करून द्यावे.

-----------------------------